दूरध्वनी क्रमांक :- ०२०-२५५०११२३
अपिल प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) यांचे
कार्यालय, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर,
पुणे - ४११ ००५
कार्यालयीन वेळ :- सकाळी १०.०० ते ०५.४५
जेवणाची सुट्टी :- दुपारी ०२.०० ते ०२.३०
खात्याचा ई मेल :-
dmcgeneral@punecorporation.org
जावक क्रमांक :-अपिल/ ३५/२०१६/उआ(सा.प्र.)/७५२
दिनांक :- १९/१०/२०१६

**अपिल प्राधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.) यांचे कार्यालय**
**पुणे महानगरपालिका**
अपिल क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा. उआ(सा.प्र.)/**अपिल /३५/२०१६**

श्री. विलास दिगंबर ढोबळे,
श्रीकृष्ण अपार्टमेंट,संत तुकारामनक्षर,
स.नं.६६/२/१८,नवी सांगवी,
पुणे ड्ढ ४११ ०२७.

-------------- अपिलार्थी

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

---

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल

**श्री.विलास ढोबळे,** (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) **राहणार** : श्रीकृष्ण अपार्टमेट,संत तुकाराम नगर,स.नं. ६६/२/१८,नवी सांगवी,पुणे-४११०२७.यांनी मा. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,आस्थापना विभाग,पुणे महानगरपालिका यांचेकडे दि.२७/०७/२०१६ रोजी अर्ज करुन ''१.कार्यालयीन आदेश जा.क्र.अमआ/उआ/से/३०८,दि.३/५/२००२ प्रमाणे दिलेला खुलासा समाधानकारक नाही.त्याबाबत सोबत कार्यालयीन आदेश प्रत सोबत जोडत आहे.त्यावरील संदर्भ क्र.२ व ३ नुसार मला १/९/२००२ पासून मूळ पदावर का नेमणूक केली त्याबाबत कार्यालयीन आदेश हवे आहेत.२.सोबत दिलेल्या अर्जानुसार माझी हॉर्टीकल्चर मिस्त्री या पदावर नेमणूक करणेबाबत मा.मुख्य उद्यान अधिक्षक यांचे पत्रान्वये जा.क्र. उका जा/५९३,दि.३१/५/२०१६ बाबत माहिती द्यावी. '' **इ.** माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,आस्थापना विभाग,पुणे महानगरपालिका यांनी दिनांक ३०/०८/२०१६ चे पत्रान्वये अपिलार्थी यांना माहिती पाठविली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दिनांक | माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थीस माहिती पाठविल्याचा दिनांक | विलंब दिवस |
| २७/७/२०१६ | ०१/८/२०१६ | ०१/९/२०१६ | ३०/०८/२०१६ | लागू नाही |

अपिलार्थीने दिलेली माहिती विसंगत असल्याचे कारण नमूद करुन दि.२३ /०९/२०१६ रोजी प्रथम अपिल अर्ज दाखल केला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपिल अर्जाचा दिनांक | अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | अपिल दाखल करावयाचा अंतिम दिनांक | अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? |
| २३/९/२०१६ | २६/९/२०१६ | ३०/९/२०१६ | होय | लागू नाही |

सदर अपिल अर्जावर दि.१४/१०/२०१६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर अपिल सुनावणीस श्री.शाम तारु, प्रशासन अधिकारी,आस्थापना विभाग हे उपस्थित होते.अपिलार्थी श्री.विलास ढोबळे हे उपस्थित होते.

## विवेचन

अपिलार्थी यांनी मागणी केल्याप्रमाणे माहिती मिळाली नसल्याचे सांगीतले.मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ मधील संदर्भ क्र.२ व ३ चे कार्यालयीन आदेश मिळावेत अशी सुनावणीदरम्यान मागणी केली.

## आदेश

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ मधील संदर्भ क्र.२ व ३ चे कार्यालयीन आदेशांचा दफ्तरी शोध घेवून उपलब्ध झाल्यास अपिलार्थी यांना पुढील १० दिवसांत देण्यात यावेत.

(प्रकाश बोरसे)
अपिल प्राधिकारी
तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

18/10/2016

**टीप:** सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय ईमारत, ४ था मजला, पुणे – १ यांचेकडे द्वितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.